## निशाणी क्र. १५ खालील आदेश

गैरअर्जदाराने हिंदू विवाह अधिनियम, १९५५ चे कलम २४ अंतर्गत अंतरिम पोटगी मिळण्यासाठी आणि न्यायालयीन कार्यवाहीचा खर्च मिळण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

०२. गैरअर्जदारचे थोडक्यात असे म्हणणे आहे की, तिचे व अर्जदाराचे पती–पत्नीचे नाते अद्याप अस्तित्वात आहे. तिला अर्जदारापासून दोन मुले आहेत. ती तिच्या मुलांचा सांभाळ करत आहे. अर्जदाराने तिला दिलेल्या शारीरिक व मानसिक त्रासाबाबत तिने मूळ म्हणण्यात सविस्तरपणे कथन केले आहे. ती सन २०१६ पासून दोन मुलांसह माहेरी राहत आहे. अर्जदाराने तिचा व तिच्या दोन मुलांचा उदरनिर्वाह, शिक्षण, कपडेलत्ता व दवाखना याची कधीही व्यवस्था केली नाही. उलट तो तिच्याकडे घटस्फोटाची मागणी करत आहे. त्याचा स्वतःचा टेम्पो आहे. तसेच त्याची मौजे बावी तालुका बार्शी येथे १६ एकर जमीन आहे. तसेच त्याचे भिवडी येथे स्वतःचे घर असून त्याने ते भाड्याने दिले आहे. त्याला दरमहा ५०,०००/– रूपये उत्पन्न मिळते. अशा प्रकारे कथन करत गैरअर्जदाराने अर्जदार याने तिला व तिच्या मुलांना दरमहा प्रत्येकी १५,०००/– रुपये अंतरिम पोटगी द्यावी आणि अर्जाचा खर्च ५०,०००/– रुपये द्यावा असा आदेश होण्यास या न्यायालयास विनंती केली आहे.

०३. अर्जदाराने सदरच्या अर्जावर त्याचे म्हणणे सादर केले आहे. त्याने गैरअर्जदाराने केलेल्या कथनांना नकार दिला आहे. तसेच त्याने गैरअर्जदाराने त्याचे उत्पन्नाचे साधन व उत्पन्नाबाबत केलेल्या कथनांना नकार दिला आहे. त्याचे असे म्हणणे आहे की, गैरअर्जदार ही उमेद अभियान, सोलापूर अंतर्गत महिला बचत गटाचे काम करते. त्यातून तिला दरमहा १५,०००/– रुपये पगार मिळतो. त्याच्यावर त्याचे वृध्द आई–वडिलांची जबाबदारी आहे. त्याची गैरअर्जदाराच्या मागणीप्रमाणे पोटगी देण्याची ऐपत नाही. तसेच गैरअर्जदाराने स्वतःहून त्याचा त्याग केला असल्याने तिला सदरचा अर्ज दाखल करता येणार नाही. अशा प्रकारे कथन करत अर्जदाराने गैरअर्जदाराचा अर्ज

रद्द करण्यात यावा, अशी या न्यायालयास विनंती केली आहे.

०४. माझे विचारार्थ खालील मुद्दे निर्माण झाले असून त्यावरील माझे निष्कर्ष व कारणमिमांसा खालीलप्रमाणे आहेतः–

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | गैरअर्जदार ही बाब शाबित करते काय की, प्रथम दर्शनी तिच्याकडे उदरनिर्वाहासाठी पुरेसे स्वतंत्र उत्पन्न नाही? | होय. |
| २ | गैरअर्जदार ही बाब शाबित करते काय की, प्रथम दर्शनी अर्जदार हा चांगला कमावता व्यक्ति आहे? | होय. |
| ३ | गैरअर्जदार ही तिने विनंती केल्याप्रमाणे अंतरिम पोटगी मिळण्यासाठी पात्र आहे काय? | अर्जदार ही दरमहा २,०००/– रुपये अंतरिम पोटगी आणि न्यायालयीन कार्यवाहीसाठी एकुण ३,०००/– रुपये खर्च मिळण्यास पात्र. |
| ४ | काय आदेश? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## का र ण मि मां सा

**मुद्दा क्र. १ बाबतः–**

०५. मी अर्जदाराचे विद्वान वकील साहेबांचा युक्तिवाद ऐकला. युक्तीवादाच्या तारखेला आणि आजही गैरअर्जदार व तिचे विद्वान वकील साहेब गैरहजर आहेत. मी अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले. वर नमूद केल्याप्रमाणे गैरअर्जदाराचे असे म्हणणे आहे की, तिचे व अर्जदाराचे पती–पत्नीचे नाते अद्याप अस्तित्वात आहे. तिला

अर्जदारापासून दोन मुले आहेत. ती सन २०१६ पासून दोन्ही मुलांसह तिच्या माहेरी राहत आहे. अर्जदाराने तिचा व तिच्या दोन्ही मुलांचा उदरनिर्वाह, शिक्षण, कपडलेत्ता व दवाखाना याची कधीही व्यवस्था केलेली नाही. तसेच मी येथे हे नमूद करण्यात येते की, गैरअर्जदाराने तिचे मालमत्ता, उत्पन्न व खर्च याबाबत निशाणी–१८ प्रमाणे शपथपत्र दाखल केले असून त्यामध्ये तिने तिचे मासिक उत्पन्न दर्शविलेले नाही. तसेच तिने तिच्या सदरच्या शपथपत्रामध्ये तिच्या कडे कोणतेही उत्पन्नाचे साधन असल्याचे नमूद केलेले नाही.

०६. याउलट, अर्जदाराचे असे म्हणणे आहे की, गैरअर्जदार ही उमेद अभियान, सोलापूर अंतर्गत महिला बचत गटाचे काम करते. त्यातून तिला दरमहा १५,०००/– रुपये पगार मिळतो. तसेच त्याने निशाणी क्र. २१ प्रमाणे त्याचे मालमत्ता, खर्च व उत्पन्न बाबत शपथपत्र सादर केले आहे. त्यामध्ये त्याने गैरअर्जदार ही सुविधा हॉस्पिटल येथे नोकरीला असून तिला दरमहा ८,०००/– रुपये उत्पन्न मिळते असे कथन केले आहे.

०७. मी येथे हे नमूद करतो की, अर्जदाराने त्याच्या कथनाप्रमाणे गैरअर्जदार उत्पन्न मिळवते हे दाखविण्यासाठी कुठलाही सबळ लेखी पुरावा सादर केला नाही. याउलट, गैरअर्जदाराने तिच्या उक्त नमूद निशाणी १८ वरील शपथपत्रामध्ये मासिक उत्पन्न दर्शविलेले नाही. ही बाब लक्षात घेता, प्रथम दर्शनी असे म्हणता येईल की, गैरअर्जदाराकडे तिच्या उदरनिर्वाहासाठी पुरेसे स्वतंत्र उत्पन्न नाही. करिता, मी मुद्दा क्र. १ बाबत माझा निष्कर्ष होकारार्थी देत आहे.

**<u>मुद्दा क्र. २ बाबतः–</u>**

०८. वर नमूद केल्याप्रमाणे गैरअर्जदाराचे असे म्हणणे आहे की, अर्जदाराचा स्वतःचा टेम्पो आहे. तसेच त्याची मौजे बावी तालुका बार्शी येथे १६ एकर जमीन आहे. तसेच त्याचे भिवडी येथे स्वतःचे घर असून त्याने ते भाड्याने दिले आहे. त्याला दरमहा ५०,०००/– रूपये उत्पन्न मिळते.

०९. याउलट, अर्जदाराने गैरअर्जदार हिने त्याचे उत्पन्नाचे साधन व कमाईबाबत केलेल्या कथनांना नकार दिला आहे.

१०. असे दिसून येते की, गैरअर्जदाराने अर्जदार हा तिच्या म्हणण्याप्रमाणे उत्पन्न मिळवतो हे दाखविण्यासाठी सबळ लेखी पुरावा सादर केला नाही. असे जरी असले तरी, आजच्या काळात एखादा मनुष्य दररोज ४००/– ते ५००/– रुपये कमावू शकतो. शिवाय अर्जदार हा चांगला धडधाकट जवान पुरुष आहे. या बाबींचा विचार करता असे म्हणता येईल की, अर्जदार हा चांगला कमावता व्यक्ती आहे. करिता, मी मुद्दा क्र. २ बाबत माझा निष्कर्ष होकारार्थी देत आहे.

**<u>मुद्दा क्र. ३ बाबतः–</u>**

११. निःशंकपणे गैरअर्जदार ही अर्जदाराची पत्नी आहे आणि ती त्याचे पासून वेगळे राहत आहे. तसेच वर नमूद केल्याप्रमाणे प्रथम दर्शनी तिचेकडे उदरनिर्वाहासाठी पुरेसे स्वतंत्र उत्पन्न नसल्याचे दिसून येते. तसेच वर नमूद केल्याप्रमाणे प्रथम दर्शनी अर्जदार हा चांगला कमावता व्यक्ति असल्याचे दिसून येते. असे असताना गैरअर्जदाराचा सदरचा अर्ज आणि अर्जदाराच्या लेखी उत्तरातून अर्जदार हा गैरअर्जदाराचे पालनपोषण करण्यास नकार देत असल्याचे व टाळाटाळ करत असल्याचे दिसून येते. वास्तविकपणे त्याची गैरअर्जदाराचा पती या नात्याने तिचे पालनपोषण करण्याची सर्वस्वी कायदेशीर व नैतिक जबाबदारी आहे. करिता माझ्या मते नक्कीच गैरअर्जदार ही अंतरिम पोटगी आणि न्यायालयीन कार्यवाहीसाठी खर्च मिळण्यास पात्र आहे.

१२. असे दिसून येते की, अर्जदाराचे असे म्हणणे आहे की, गैरअर्जदार ही स्वतःहून त्याचा त्याग करुन माहेरी राहत असल्याने तिला सदरचा अर्ज दाखल करता येणार नाही. येथे हे नमूद करण्यात येते की, हा अर्ज निकाली काढताना दोन्ही पक्षकारांनी एकमेकांचे विरूद्ध केलेल्या आरोप प्रत्यारोपांच्या गुणवत्तेवर जाता येणार नाही. तर विनंती अर्जदाराचे व उत्तरवादीचे उत्पन्न लक्षात घेणे आवश्यक आहे. वर नमूद केल्याप्रमाणे प्रथम दर्शनी गैरअर्जदाराकडे उदरनिर्वाहासाठी पुरेसे स्वतंत्र उत्पन्न नसल्याचे आणि अर्जदार हा चांगला कमावता व्यक्ति असल्याचे दिसून येते.

१३. त्यामुळे आता गैरअर्जदार काय दराने अंतरिम पोटगी मिळण्यास पात्र आहे याबाबत विचार करणे आवश्यक आहे. मी येथे नमूद करतो की, आदरणीय सर्वोच्च न्यायालयाने **Rajnesh Vs. Neha [(2021) 2 SCC 324]** या प्रकरणामध्ये परिच्छेद क्र. १३० मध्ये खालील प्रमाणे निर्देष दिले आहेतः

> *"**130.** For determining the quantum of maintenance payable to an applicant, the court shall take into account the criteria enumerated in Part B — III of the judgment. The aforesaid factors are however not exhaustive, and the court concerned may exercise its discretion to consider any other factor(s) which may be necessary or of relevance in the facts and circumstances of a case."*

१४. उक्त नमूद आदरणीय सर्वोच्च न्यायालयाचे न्यायनिर्णयामध्ये नमूद कायदेशीर तत्व आणि गैरअर्जदाराकडे तिचे उदरनिर्वाहासाठी पुरेसे स्वतंत्र उत्पन्न नसल्याची बाब, गैरअर्जदारास स्वतःचे उदरनिर्वाहासाठी येणारा कमीत कमी खर्च, अर्जदाराची ऐपत, अर्जदाराला स्वतःचे उदरनिर्वाहासाठी येणारा खर्च इत्यादी बाबी लक्षात घेता, अर्जदाराने गैरअर्जदाराला तिचे उदरनिर्वाहासाठी दरमहा २,०००/– रुपये याप्रमाणे अंतरिम पोटगी देणे आणि न्यायालयीन कार्यवाहीसाठी एकुण ३,०००/– रुपये खर्च देणे आवश्यक आहे. तो सदरची रक्कम तिला सहज देऊ शकतो. करिता मी मुद्दा क्र.३ बाबत माझा निष्कर्ष त्याप्रमाणे देत आहे आणि खालील प्रमाणे आदेश पारित करत आहेः–

## <u>आदेश</u>

निशाणी–१५ वरील अर्ज अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

०२. अर्जदाराने गैरअर्जदाराला सदरचा अर्ज दाखल केला त्या तारखेपासून या प्रकरणाचा अंतिम निकाल लागेपर्यंत दरमहा २,०००/– रुपये (दोन हजार रुपये फक्त) याप्रमाणे अंतरिम पोटगी

द्यावी.

०३. अर्जदाराने गैरअर्जदार हिला न्यायालयीन कार्यवाहीसाठी एकुण ३,०००/- रुपये (तीन हजार रुपये फक्त) खर्च द्यावा.

Digitally signed by ANKUSH PUNDLIKRAO KHANORKAR
Date: 2024.08.29 17:31:01 +0530

(अंकुश पुं. खानोरकर)

दिनांक :- २९.०८.२०२४. दिवाणी न्यायाधीश, वरीष्ठ स्तर, बार्शी.

**C E R T I F I C A T E**

I affirm that contents of this PDF file Order /Judgment are word to word same, as per the original Order /Judgment.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | : Shripad N. Chilka |
| Name of the Court | : Civil Judge Sr. Division, Barshi. |
| Judgment / order signed by the Presiding Officer on | : 29.08.2024 |
| Judgment / Order uploaded on | : 29.08.2024 |